
## नवाकाळ शब्दकोडे-२२७



**आडवे शब्द –**

१. नकळतपणे, सहज आणि न ठरवता घडलेली हालचाल ५. सुवर्णखरेदीसाठी उगीचच गाजवला जाणारा गुरुवारचा योग १२. पात्रता, लायकी १४. शिस्तीतून दिलेली थोडीशी सूट १५. मेलेला, जीव गेलेला १६. मनपातील सदस्य, कॉर्पोरेटर १८. सत्त्व २२. शिरकाव करायला जागा किंवा संधी २४. संपर्क, संवाद २६. विसार, बयाणा २९. दाखल होणे, येणे ३१. सांप्रत ३३. वैर, खुन्नस ३४. दूत, निरोप्या ३६. वडिलांची बहीण ३७. तीन लोक - स्वर्ग, मृत्यू, पाताळ ३९. जबडा ४०. सत्त्व ४१. हलकी लाट ४४. रेल्वे ४७. कंठ ४८. लालची, लोभी ५०. गवई ५१. कबूतर ५३. पगार, कामाचा मोबदला ५५. अकरावी तिथी ५७. परीट ५९. पंजा व हात यांचा सांधा ६०. न्याहारी, उपवासाचे पदार्थ ६१. वर्तुळ ६३. उत्पन्न ६४. शिल्लक ६५. कच्छप, कूर्म ६७. वडापावसारखा विदेशी पदार्थ ६९. चूक झाल्याबद्दल खेद, पश्चात्ताप ७१. कावळा ७३. राजसभा ७४. नवऱ्याची भावजय ७६. विश्व ७८. वृद्धी, भर ७९. अधिकार, हक्क ८०. हिवाळ्यात पहाटे उघड्या पृष्ठभागावर जमणारे जलतुषार ८२. सहावी तिथी ८४. बरोबर, संमतीने ८६. मोठे, विस्तारलेले ८७. डासांमुळे होणारा एक आजार ८९. युद्ध ९१. मीन, मत्स्य, एक जलचर ९३. ओझे ९४. काल्याची चव ९६. प्रहार, आघात ९८. सुखरूप, सुरक्षित १००. वंचित, मुकलेला (हिं.) १०२. सरदार सरोवर प्रकल्प या नदीवर आहे १०३. तृष्णा, घशाला कोरड १०४. गायब १०६. सज्ज, सिद्ध, राजी १०७. घमघमाट १०८. सकल १०९. धडक

**उभे शब्द –**

१. प्रभुरामचंद्रांची नगरी २. दैव, नशीब ३. छत, चांदवा ४. पावलांचा आवाज ६. प्रथा, परंपरा ७. रोमांच ८. एक नक्षत्र, हरीण ९. सहवास, घटना घडून येणे १०. भूतकाल ११. अजून १३. मोठा पतंग, अफवा १७. एक शेंगभाजी १९. घर, वास्तू २०. गर्भपात २१. पहाट २३. नशा २५. विक्षिप्त, तऱ्हेवाईक २७. चहाडी, चुगली २८. गुप्तचर २९. सजावट ३०. सहाय्य ३२. न बोलणारा, मौनस्थ ३४. हेळसांड ३५. उपवासाला चालणारी फळभाजी, हिची कोशिंबीर करतात ३६. चारचौघाहून निराळा, हटके ३८. स्वेटरमधील मुख्य घटक ४२. वर्ण ४३. थोर, मोठे ४४. गच्ची, चंद्रशाळा ४५. निखाऱ्यावर भाजलेली रोटी ४६. सूर्यापासून मिळणारी ऊर्जा ४९. टिंगल, चेष्टा ५१. साखरेचा गरम रस ५२. दुराचार ५४. किल्ल्याची संरक्षक भिंत ५५. इतके ५६. केविलवाणा ५८. पृथ्वीचा पाण्याने व्यापलेला पृष्ठभाग ६०. मुस्लिम साधू ६२. नरमांजर ६३. बळजबरी ६४. बिचारा ६६. सभा, बैठक ६८. कर्मचाऱ्यांची वैयक्तिक सुट्टी ७०. तृतीया ७१. उशीर ७२. योग्य वर्तन, चांगली वागणूक ७५. मिठागर ७७. लोचट ७८. गंध, राहणे ८१. मुळाक्षरे ८३. स्वाद, रुची ८५. एकसारख्या अनेक वस्तू बनवण्यासाठी साचा, डाय ८६. प्रिय व्यक्तीशी ताटातूट झालेला ८७. विरस ८८. बल, शक्ती ९०. तख्त, सिंहासन ९२. साधने ९५. नम्रता ९६. कमतरता ९७. हळवा, व्याकूळ ९९. नित्य, नेहमी १०१. चिडखोर, रागीट १०४. अहंकार १०५. या झाडापासून कात मिळतो •

**नवाकाळ कोडे क्रमांक २२६ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. वसुधा ४. अकरावा रुद्र ९. गौप्यस्फोट ११. सारवासारवी १३. दानशूर १४. खोट १५. व्यावसायिक १६. वरकस २०. चुणूक २१. निशाण २२. रेखाटन २५. शरम २७. चवली २८. राजा २९. परवाना ३०. माय ३१. नोट ३३. पुर ३४. वजनदार ३५. जाणूनबुजून ३६. पढतमूर्ख ३८. थर ४०. खण ४१. वानवा ४३. मीठ ४५. नग ४६. जोवर ४८. भेली ४९. यव ५०. बळकावणे ५२. सांबार ५३. खांड ५४. भव्य ५५. कवच ५६. जरा ५७. चेव ५९. सासरा ६०. हट्टी ६१. नाखवा ६४. डरावडराव ६६. भगर ६७. लुगडे ६८. बस ६९. बरवा ७०. हुल्लड ७१. रहाट ७२. भ्राता ७३. नखरेल ७५. सुन्न ७६. बूज राखणे ७७. कालवा ७८. आजारी ८०. कपाट ८२. वैरण ८४. रुमाली रोटी ८७. शकट ८९. बारव ९०. गवत ९२. दैवी ९३. पथक ९४. सागरतीर ९५. कळकळ

**उभे शब्द** : २. सुसाट ३. धार ४. असा ५. करमणूक ६. रावी ७. रुद्रावतार ८. कनक ९. गौरवशाली १०. स्फोटक १२. वाफ १३. दायित्व १३. खोबरे १७. रण १८. समजावून सांगणे १९. खेटर २१. निवडणूक २३. खापरपणजोबा २४. नवागत २५. शयनयान २६. मनोरथ ३०. माज ३२. अंबुज ३४. वर्ख ३७. मूल ३९. रमी ४१. वाली ४२. वायव्य ४४. जाळ ४५. नवरा ४७. वरचेवर ४८. भेडसावणारे ५०. बचनाग ५१. काजवा ५२. सांगड ५४. भराभर ५५. कट्टी ५८. वडवानल ६०. हरहुन्नरी ६२. खडे ६३. घसट ६५. राबता ६७. लुडबूड ६८. बहाणे ७१. रखवाली ७२. भ्रामक ७४. खवाटा ७५. सुजाण ७७. काटक ७८. आरवसा ७९. लोटी ८१. पाशवी ८२. वैर ८३. भोवती ८५. मालक ८६. रोचक८८. टप ८९. बाक ९०. गर ९१. तर

# कोरोना रुग्णसंख्येत घट

■ नवी दिल्ली

**वाढत्या** कोरोना रुग्णसंख्येत आज देशातील नागरिकांना काहीसा दिलासा देणारी बातमी समोर आली. काल, सोमवारी दिवसभरात देशात १३ हजार ०८६ नव्या कोरोनाबाधितांची नोंद झाली, तर २४ कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला. तसेच १२ हजार ४५६ रुग्ण कोरोनामुक्त झाले. रविवारच्या तुलनेत सोमवारी नव्या रुग्णांच्या संख्येत घट झाली.

## राशीभविष्य

बुधवार, दि. ६ जुलै २०२२

संजय मनोहर

**मेष** – लांबलेल्या कामांना गती देण्याचा प्रयत्न यश देईल. अडचणीस नातेवाईक, मित्रांची मदत मिळेल. सुख वाढविणाऱ्या गोष्टींची खरेदी कराल.

**वृषभ** – नोकरीव्यवसायात कमाई समाधानकारक होईल. तुमचा फायदा इतर कोणी करून घेणार नाही, याबाबतीत दक्ष असावे. सत्संगाचा लाभ होईल.

**मिथुन** – काही बाबतीत समाधान देणारा दिवस. हाताखालील व्यक्तीवर जरुरीपुरताच विश्वास ठेवावा. प्रवास कार्यसाधक व सुख वाढविणारे ठरतील.

**कर्क** – सरकारी कायद्याचा भंग होणार नाही, हे बघावे. मित्रमैत्रिणींमध्ये पतप्रतिष्ठा वाढेल. कला, क्रीडा, छंद यात रमाल.

**सिंह** – नोकरीत कोणाच्या सहकार्याची अपेक्षा धरू नका. संततीस त्यांच्या चुका त्यांच्या भल्यासाठी सांगणे गरजेचे ठरेल. सामाजिक, सांस्कृतिक कार्यात भाग घ्याल.

**कन्या** – नोकरीत काही अपेक्षित गोष्टी घडतील. बँकेची, शासनाची, कर्जाची अडलेली कामे मार्गी लागतील. देवदर्शनानिमित्त प्रवास घडेल.

**तूळ** – जोडीदाराशी वादविवाद टाळावेत. काही बाबतीत मन प्रसन्न करणाऱ्या गोष्टी घडतील. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमात भाग घ्याल.

**वृश्चिक** – तरुणांना नवीन संधीसाठी केलेले प्रयत्न यश देतील. काहींना कमी श्रमात अधिक आर्थिक लाभ संभवतो. वाहने जपून चालवावीत.

**धनु** – नोकरीत वरिष्ठ, कनिष्ठांचे उत्तम सहकार्य मिळेल. कर्ज कमी करण्याचे प्रयत्न सफल होतील. योग, वाचन, श्रवण, मननामुळे मनाची प्रसन्नता वाढेल.

**मकर** – खरेदी विक्री करताना फसवले जाणार नाही, याचे भान ठेवावे. संततीच्या योग्य मागण्या मान्य कराव्यात. प्रवास कार्यसाधक व नवीन उमेद निर्माण करतील.

**कुंभ** – आवडत नसलेली माणसे, परिस्थिती काही प्रमाणात सहन करावी लागेल. शेजाऱ्यांशी वादविवाद टाळावेत. चौकशीअंती केलेली खरेदी समाधान

**मीन** – खर्च अपेक्षेपेक्षा अधिक झाल्यामुळे अडचणीत वाढ होईल. जुनी ओळखीची माणसे, मित्र भेटतील. काहींना कमी पैशात अधिक लाभ संभवतात.

### शुभ राशी दि. ०६/०७/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | ६ | ४ |
| १३ | ६३ | ४३ |
| १८ | ६८ | ४८ |
| ५६० | ३६७ | २५७ |
| १२८ | १५० | १४९ |

# मुंबईसह कोकणाला पावसाने झोडपले

पान १ वरून

मोठी दुर्घटना घडली. पाचल कोडंवाडी (पवार वाडी) येथे अर्जुना धरणाचा उजवा कालवा फुटला. यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांची भात शेती वाहून गेली.

सिंधुदुर्गातील सावंतवाडी तालुक्यातील तळवडे, कणकवली तालुक्यात खारेपाटण येथील बाजारपेठेत पुराचे पाणी घुसले होते. छोट्या पुलावर पाणी आल्यामुळे वाहतूक काही काळ ठप्प होती. पाणी ओसरल्यावर पुन्हा वाहतूक पूर्ववत झाली. कुडाळ तालुक्यातील माणगाव खोऱ्यात मुसळधार पाऊस कोसळला. या पावसामुळे निर्मला नदीला मोठा पूर आला. आंबेरी पुलावर पाणी आले. त्यामुळे पुढील २७ गावांचा संपर्क तुटला. या पुराचा फटका शाळकरी मुलांना बसला. ही मुले अडकून पडली, तर वाहन चालकांचाही खोळंबा उडाला आहे. रायगड जिल्ह्यात दमदार पाऊस कोसळला. महाड शहरातून वाहणारी सावित्री आणि गांधारी नदीच्या पाण्याने पूररेषा ओलांडली. त्यामुळे महाड शहराच्या बाजारपेठेत पुराचे पाणी शिरले. खबरदारीचा उपाय म्हणून तेथील काही नागरिकांनी आपल्या गाड्या पुलावरती पार्क केल्या होत्या. रोहा येथील कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे तेथे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. अलिबागनजीकचा धरमतर येथील रस्ता उखडून गेला. पोलादपूर जवळील कशेडी घाटातील चोळई येथे दरड कोसळली. सुरक्षेचा उपाय म्हणून २० कुटुंबांतील ७५ जणांना पोलादपूर येथे हलवण्यात आले आहे.

कोल्हापूरमध्ये सोमवारपासून जोरदार पाऊस सुरू झाला होता. या पावसामुळे पंचगंगेच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून एका रात्रीतच पंचगंगेची पाणीपातळी ७ फुटांनी वाढली. सध्या पंचगंगा नदीची पाणीपातळी २४ फुटांवर गेली. त्यामुळे नागरिकांना जिल्हा प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. कोल्हापुरातील राजाराम पुलासह १४ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. या पावसामुळे जिल्ह्यातील सगळ्या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे कोल्हापुरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अमरावती, अकोला, नांदेड भागातही जोदार पाऊस आज झाला.

मुंबईसह आजूबाजूच्या परिसरात काल रात्रीपासून पावसाने दमदार हजेरी लावली होती. दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी आणि दुपारी पाऊस कायम होता. सायन-कुर्ला-माटुंगा अन्य स्थानकावरील रेल्वे रुळावर पावसाचे पाणी साचले होते. त्यामुळे मध्य रेल्वे आणि हार्बर रेल्वे मार्गाची लोकलसेवा मंदावली होती.



कुर्ल्यातील माकल हायस्कूल आणि नेहरू नगर परिसर जलमय झाला होता. त्यामुळे तेथील शाळातील सुट्टी जाहीर करण्यात आली. दादर पूर्व आणि माटुंगा गांधी मार्केट परिसरात पावसाचे पाणी साचले होते. त्यामुळे तेथील लोकांनी रस्त्यावरील साचलेल्या पाण्यातून मार्ग काढावा. हिंदमाता, ट्रॉम्बे, वडाळा, जंक्शन, किंग सर्कल, चेंबूर परिसरात देखील अशीच परिस्थिती होती. तेथील रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले होते. कुर्ला हायवे जंक्शन रस्ता, चेंबूर रेल्वे स्थानक परिसर, चेंबूर सब वे याठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाले होते. परिणामी रस्ते वाहतुकीला मोठा फटका बसला. तर वडाळ्यातील घाटकोपर येथील खंडोबा टेकडीवर असलेल्या पंचशील नगर येथे एका घरावर दरड कोसळली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी घराचे मोठे नुकसान झाले. या घटनेनंतर घरातील संपूर्ण कुटुंब जीव मुठीत घेऊन घराबाहेर पडले. तसेच घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडवर पाणी साचल्याने वाहतूक धीम्या गतीने सुरू होती. वडाळ्यातील विद्यालंकार महाविद्यालय परिसरात पावसाचे पाणी जमा झाले होते. अंधेरीचा सब वे पाणीखाली गेला होता. त्यामुळे वाहतुकीसाठी हा सब वे बंद करण्यात आला होता. ठाण्यातील कन्हैयानगर, कोपरी केदारेश्वर वाडी, वागळे इस्टेट, साठे नगर येथील गणेश चाळीजवळ, पोलीस लाईन आयुक्त कार्यालयाच्या मागील चाळीजवळ, घोडबंदर रोडवरील कासारवडवली, आदर्श विद्यामंदिर, पारसिकनगर शंकर मंदिर जवळील बुबेरा चाळीजवळ येथील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने ठाणेकरांची चांगलीच तारांबळ उडाली.

ठाण्यातील लुईस वाडीत पालिकेचे सहाय्यक आयुक्तांच्या गाडीवर झाड कोसळले. सुदैवाने घटनेवेळी गाडीत कोणीच नव्हते. ठाणे शहरातील वंदना एसटी विभागीय कार्यालयाची सुरक्षा भिंत दोन घरांवर कोसळून गोपाळ पांचाळ (५८) हे जखमी झाले. या घटनेत दोन घरांचे पत्रेही फुटून नुकसान झाले. तर ४ घरे खाली करण्यात आली असून उथळसर प्रभाग समिती मार्फत स्थलांतर केले गेले आहे. तसेच मुंब्रा, दत्तवाडी येथील अनिल भगत चाळीची सुरक्षा भिंत कोसळली. पालघरसह वसई आणि विरारमध्ये देखील पावसाने फटकेबाजी केली होती. विरारच्या विवा कॉलेज परिसरात पावसाचे पाणी साचले होते. डहाणू शहरांतील इराणी रोड, जलाराम मंदिर परिसर जलमय झाला होता, तसेच बाजारपेठेतील काही दुकानात पाणी शिरले, डहाणू बोर्डी रस्त्यावरील खुटखाडी पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक ठप्प झाली. मुसळधार पावसामुळे पनवेलच्या पाताळगंगा नदीला पूर आला आहे. या नदीच्या शेजारील राहणाऱ्या लोकांना सतर्कतेचा इशारा दिला होता. तसेच जुई नगर स्थानक परिसरातील रस्त्यावर प्रचंड पाणी साचल्याने वाहनचालक चांगलीच कसरत करावी लागली. उलग्वे परिसरात रस्त्यावर पाणी साचल्यामुळे एका मोठ्या बससह अनेक वाहने अडकून पडली होती. मुरूड तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळला. तेथील बोर्ली मांडला नाक्यावर असणाऱ्या दुकानातून पाणी घुसले. त्यामुळे दुकाने बंद ठेवली होती. तर तेथील रस्ते वाहतुकीवर मोठा परिणाम झाला होता. दरम्यान कोल्हापुरात नागरिकांना पूर परिस्थितीची वेळीच सूचना द्यावी. पूरग्रस्त भागातून नागरिकांचे स्थलांतर करावे असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

### मुख्यमंत्र्यांचे सतर्क राहण्याचे निर्देश

वाढता पाऊस आणि पुराची शक्यता पाहता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्याशी चर्चा केली असून सबंधित पालक सचिवांना त्या-त्या जिल्ह्यांमध्ये पोहचून प्रत्यक्ष देखरेख व नियंत्रण करण्याचे निर्देश दिले आहेत.


**महावितरण** – महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

महावितरण कंपनीमध्ये कॉर्पोरेट कार्यालयखकरिता माहिती तंत्रज्ञान साहित्याचा (लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर इत्यादि ) वार्षिक सर्वसमावेशक देखभाल (Comprehensive AMC) आणि जागेवर सुविधा व्यवस्थापन (FMS) करिता पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. https://www.mahadiscom.in/supplier/ या संकेत स्थळावर निविदा सुचनेमध्ये संक्षिप्त माहिती व पात्रता निकष उपलब्ध आहेत. निविदापूर्व बैठक व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे (https://meet.google.com/jip-meat-zvq) ०७-०७-२०२२ रोजी १५:०० वाजता होईल तर निविदा भरण्याची अंतिम तारीख १४-०७-२०२२ रोजी १७:०० वाजेपर्यंत असेल. संपूर्ण निविदा (Tender Document) संकेतस्थळ https://etender.mahadiscom.in वर उपलब्ध आहेत.

**निविदा क्र.** CGM-IT/AMC-FMS/ 2022-23/1
**निविदा रक्कम** : ₹ ५९००/-
**इसारा रक्कम** : ₹ १,६१,३८०/-
**HOPR: ६७ dtd: ०४/०७/२०२२**

**मुख्य महाव्यवस्थापक (मा. त.),**
महावितरण, प्रकाशगड , ४था माळा,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे पूर्व
मुंबई -५१
ई-मेल: itetender@mahadiscom.in

**SBI**
## भारतीय स्टेट बँक
कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

### सूचना

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली - ११००५५ (इमेल आयडी: **sbi.igr@alankit.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ००८११९१३ | बच्चो लाल चौधरी यमुना देवी | ५३० | ६७४२३ | ६७४२४ | ७३८९५९०७०१ | ७३८९५९१२३० |
| २ | ०१०२१३१५ | ए एन चतुर्वेदी श्री टी एन चतुर्वेदी | ३०० | २३३५८ | २३३५८ | ७३७८१५७९११ | ७३७८१५८२१० |
| ३ | ००८००१५३ | चंद्रा भान सिंह सिसोदिया कृष्णा सिसोदिया | ५०० | ६१७९५ | ६१७९५ | ७३८८१३५६७१ | ७३८८१३६१७० |
| ४ | ०७५१७८४७ | सुरेश कुमार चौधरी | १९६ | ६३१७८८२ | ६३१७८८२ | ८०६१८४१८३८ | ८०६१८४२०३३ |
| ५ | ०१७५८३७१ | एंथनी फर्नांडीस श्रीमती माफ़लदीना फर्नांडीस | ५०० | १५३९१० | १५३९१० | ७४२३६६८८८१ | ७४२३६६९३८० |
| ६ | ०७४१४४७० | राजाह जे न | २२० | ६२१४९११ | ६२१४९११ | ८०१३७६००१५ | ८०१३७६०२३४ |
| ७ | ०१००४६१९ | के लीलादेवी | १०० | ४९१६ | ४९१६ | ७३७०३१९३११ | ७३७०३१९४१० |
| ८ | ०३०३३७०६ | उमा योगेश उप्पल | ५०० | २१०४८४ | २१०४८४ | ७४५२८०७४४१ | ७४५२८०७९४० |
| ९ | ००८०५१०२ | ओम प्रकाश सुनीता | ५३० | ६४१९५ | ६४१९६ | ७३८८७६७४७१ | ७३८८७६८००० |
| १० | ००८०३४३४ | लक्ष्मण प्रसाद यादव रूपेश कुमार | ५३० | ६३३२४ | ६३३२५ | ७३८८५४३६८१ | ७३८८५४४२१० |
| ११ | ०६०१४०८० | रेजिना एजिकियल बोर्गओंकरी | १००० | २२५१८९ | २२५१८९ | ७४५९४७२४७१ | ७४५९४७३४७० |
| १२ | ०११६६७९२ | साधना अग्रवाल | ५०० | १२०२३२ | १२०२३२ | ७४०६४०५६८१ | ७४०६४०६१८० |
| १३ | ०१०१५६८४ | जया बसु राहुल बसु | ११३० | १०८०९६ | १०८०९७ | ७३९९८०३५४१ | ७३९९८०४६७० |
| १४ | ००८७८०१८ | कुरपति महेंद्र पाल चलन्ति रवींद्र देवी | ५३० | ९१६१९ | ९१६२० | ७३९५६१७०८१ | ७३९५६१७६१० |
| १५ | ०१६६८९४८ | विजय छितरमल अग्रवाल | ५०० | १५०६६३ | १५०६६३ | ७४२२००४६८१ | ७४२२००५१८० |
| १६ | ०७११७४५१ | बिनीता कुजुर | २०० | २३४५१० | २३४५१० | ७४६२८४६३५१ | ७४६२८४६५५० |
| १७ | ००७९३८८० | ए गीता श्री डॉ के वीरेन | ११० | ५९३९१ | ५९३९२ | ७३८७५३८२६१ | ७३८७५३८३७० |
| १८ | ०७१२९५०९ | अथोता गीताश्री वीरेन कटिवारपु | ६०० | २३९८४९ | २३९८४९ | ७४६५१९६१८१ | ७४६५१९६७८० |
| १९ | ०१५६५९७१ | ज्योति भारत भाटिया भारत भाटिया | ५०० | ९०९३ | ९०९३ | ७३७२०५९५५१ | ७३७२०६००५० |
| २० | ००८२६२१४ | रुबीना गोस्वामी | ६४० | ७३५८३ | ७३५८४ | ७३९११८९४५१ | ७३९११९००९० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ०६.०७.२०२२

समभागांची संख्या: ९६१६
स.प्रमाणपत्रांची संख्या: २७

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)